# फौजदारी कायदे, सुधारणा पुरवणी २०१३

## फौजदारी कायदे सुधारणा पुरवणी

दिल्ली येथील निर्भया प्रकरणानंतर महिलासंबंधीच्या गुन्ह्यासंदर्भाने अनेक बाबींचा विचार होवून फौजदारी कायद्यांमध्ये अनेक सुधारणा केल्या गेल्या त्या खालीलप्रमाणे

**फौजदारी कायदे सुधारणा पुरवणी मधील प्रकरण २ मध्ये भारतीय दंड विधानात खालील प्रमाणे सुधारणा केल्या गेल्या . भारतीय दंड विधान कलम 166A.CCS:-**

Fails to record any information given to him under sub-section (1) of section 154 of the code of criminal procdure,1973 in Relationto congnizable offence punishable under section 326A, section 326B,section 354, section 354B, section 370,section 370A, section 376, section 376A, section 376B ,section 376C ,section 376D, section 376E or section 509

**कलम १६६ ब :- पीडित व्यक्तीवर उपचार न केल्याबद्दल शिक्षा सार्वजनिक वा खासगी रुग्णालयात पीडित व्यक्तीचा उपचार न केल्यास एक वर्षाचा तुरूंगवास किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकते.**

१) नवीन कलम ३२६-अ व ३२६-ब, समाविष्ट करणे कलम ३२६ नंतर ही कलमे समाविष्ट करण्यात येतील. ३२६-अ, ॲसिड इत्यादीचा वापर करून स्वच्छेने गंभीर दुखापत करणे (यात ॲसिड फेकून शारीरिक इजा करणे वा ॲसिड पाजणे)

अशा गुन्हेगारास दहा वर्षे कारावास वा आजीवन कारावास होऊ शकेल. त्याला द्रव्यदंड होईल तो पैसा पीडिताला देण्यात येईल.

**३२६-ब** स्वच्छेने ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे यात

ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केल्यामुळे दुखापत झालेली व्यक्ती तात्पुरती व कायमस्वरूपी विकलांग झाली तर गुन्हेगारास पाच ते सात वर्षांचा कारावास व द्रव्यदंडही होईल.

**२) कलम ३५४ ची सुधारणा :-** आधी कलम ३५४ मध्ये दोन वर्षाचा कारावास किंवा द्रव्यदंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र अशी तरतूद होती. आता यात सुधारणा करून गुन्हेगारास १ वर्षा पेक्षा कमी नसणे व पाच वर्षापर्यंत शिक्षा होईल व द्रव्यदंडही होईल.

**३) कलम ३५४ मध्ये** ३५४–अ, ३५४–ब,३५४–क व ३५४–ड समाविष्ट करणे.

**३५४–अ:-** पुरुषाला लैंगिक छळवणूक व लैंगिक छळवणुकीसाठी शिक्षा– एखादा पुरुष अवांछनीय लैंगिक सूचना, शारीरिक स्पर्श, मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न, लैंगिक अनुग्रहाची मागणी इच्छेविरूद्ध संभोग, संभोगदर्शन दाखविणे (महिलेच्या इच्छे विरुद्ध लैंगिकपूर्ण शेरेबाजी हे गुन्हे येतात. अशा गुन्हेगारांना तीन वर्षापर्यंत कारावास किंवा द्रव्यदंड वा दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

**३५४–ब :-** विवस्त्र करण्याच्या उद्देशाने महिलेवर हल्ला करणे किंवा फौजदारी बळाचा वापर करणे.

कोणत्याही महिलेला एकांतात वा सार्वजनिक ठिकाणी नग्न होण्यास भाग पाडील, तिच्यावर हल्ला करून किंवा फौजदारी बळाचा वापर करून असे कृत्य करणाऱ्यास अपप्रेरणा देईल, अशा गुन्हेगारास तीन वर्षांपेक्षा कमी नसेल व सात वर्षांपर्यंत वाढविता येईल असा कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**३५४–क :-** दुसऱ्या व्यक्तीला नग्न असतांना किंवा लैंगिक क्रीडा असतांना त्यांना चोरून पाहणे व त्याद्वार लैंगिक समाधान मिळविण्याची विकृती अशा विकृत गुन्हेगाराला १ वर्षापासून तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा, द्रव्यदंडासही प्राप्त होईल.

**३५४–ड :-** छुपा पाठलाग करणे

एखाद्या स्त्रीने तिला आस्था नसल्याचे स्पष्टपणे सांगितले तरी वैयक्तिक परिचय वाढवण्यासाठी महिलेचा पाठलाग करणे व तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे.

इंटरनेटच्या, ई-मेलच्या किंवा इलेक्ट्रॉनिक संदेश वहनांद्वारे संपर्काचा प्रयत्न करणे. अशा गुन्हेगारास तीन ते पाच वर्षांपर्यंत कारावास व द्रव्यदंडही होऊ शकतो. याला अपवाद असेल.

**अ)** गुन्ह्याच्या प्रतिबंधासाठी किंवा तपासासाठी पाठलाग करणे.

**ब)** विशिष्ट परिस्थितीत संयुक्तिक व समर्थनीय असा छुपा पाठलाग होते हे सिद्ध झाले तर.

**७) कलम ३७० ऐवजी नवीन कलम ३७० व ३७०-अ दाखल करणे.**

**कलम ३७० :-** व्यक्तीचा अपव्यापार करणे- एखाद्या व्यक्तीचे शोषण करण्याच्या उद्देशाने धमकीचा वापर करणे, बळाचा वापर करणे, अपहरण करणे, लबाडी किंवा फसवणुकीचा अवलंब करणे, अधिकारांचा गैरवापर करणे.

यात भरती करणे, वाहतूक करणे, आसरा देणे, हस्तांतर करणे, स्वीकार करणे हे गुन्हे अपव्यापार या गुन्ह्यात येतात. शोषणात शारीरिक, लैंगिक, गुलामगिरी, गुलामगिरीसारख्या प्रथा, दास्य प्रथा किंवा बळजबरीने अवयव काढणे याचा समावेश होतो.

- जी व्यक्ती वरील प्रमाणे अपव्यापार करील अशा गुन्हेगारास सात वर्षांपेक्षा कमी नसेल व दहा वर्षांपर्यंत तुरुंगवास व द्रव्यदंडाची शिक्षा होईल.
- अशा अपव्यापारामध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ती सामील असतील त्यांनाही दहा वर्षांपेक्षा कमी नसेल व आजीवन कारावासाची शिक्षा होऊ शकते. शिवाय द्रव्यदंडही होऊ शकतो. कारावास हा सश्रम कारावास असेल.
- जर अपव्यापारामध्ये अज्ञान व्यक्तीचा अंतर्भाव असेल तर गुन्हेगाराला दहा वर्षांपेक्षा अधिक व आजीवन कारावासाची शिक्षा तसेच द्रव्यदंडाचीही शिक्षा होऊ शकते.
- जर अशा अपव्यापारामध्ये एकापेक्षा अधिक अज्ञान व्यक्तींचा समावेश असेल तर.
- जर एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक वेळा अज्ञान व्यक्तीचा अपव्यपार करेल तर ती गुन्हेगार व्यक्तीला आजीवन कारावासाची व द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.
- कोणत्याही व्यक्तीच्या व्यापारामध्ये लोकसेवकाचा वा पोलीस

अधिकाऱ्याचा सहभाग असेल तर ते आजीवन कारवासाच्या शिक्षेस पात्र ठरतील व त्यांना द्रव्य दंडाचीही शिक्षा होईल.

**८) कलम ३७०(अ) :- अपव्यपार केलेल्या व्यक्तीचे शोषण**

अज्ञान व्यक्तीला लैंगिक शोषणाच्या कामावर लावणे. अशा गुन्हेगाराला पाच वर्षापासून सात वर्षापर्यंत सक्षम कारावासाची शिक्षा व द्रव्यदंड होऊ शकतो.

जर एखाऱ्या व्यक्तीस हे माहीत असेल की एखाद्या व्यक्तीचा अपव्यवहार झाला आहे तरी ती व्यक्ती पीडित व्यक्तीला लैंगिक शोषणाच्या कामावर लावत असेल तर त्या व्यक्तीला ३ ते ५ वर्षांचा कारावास तो ही सश्रम असेल. शिवाय द्रव्यदंड होऊ शकतो.

**९) दंड संहितेच्या कलम ३७५,३७६,३७६-अ, ३७६-ब,३७६-क, ३७६-ड ऐवजी पुढील कलमे दाखल करण्यात येतील.**

## ३७५ -बलात्कार

१) बलात्कारामध्ये स्त्रीच्या संमतीशिवाय अनैसर्गिक बलात्कार करणारा पुरुष स्वत: वा इतर व्यक्तीशी असा अनैसर्गिक बलात्कार करायला भाग पाडीत असेल.



२) गुन्हेगार शिश्नाशिवाय इतर वस्तूचा वापर करीत असेल व दुसऱ्याला करायला लावीत असेल.

३) स्त्रीच्या अवयवांना अश्लीलतेने हाताळत असेल वा दुसऱ्या व्यक्तीला हाताळायला लावीत असेल वा इतरही घाणेरडी कृत्ये करीत असेल.

४) स्त्रीच्या प्रियजनांना दुखापत करण्याच्या वा मारण्याची धमकी देऊन बळजबरीने बलात्कार करीत असेल.

५) लग्नाचे आमिष दाखवून स्त्रीच्या संमतीने शरीरसंबंध स्थापित करीत असेल.

६) एखाद्या स्त्रीला मादक पदार्थ देऊन किंवा दुसऱ्याकडून देववून ती नशेत असतांना बलात्कार करीत असेल.

७) अल्पवयीन मुलीबरोबर शरीरसंबंध केल्यास (जरी तिची संमती असेल तरीही) तो बलात्कारच ठरतो.

८) जेंव्हा एखादी स्त्री आपली संमती कळविण्यास असमर्थ असेल तर तो शरीर संबंध बलात्कार होतो.

९) शारीरिक दृष्ट्या प्रतिकार न करणारी स्त्री ही असहाय अवस्थेत असतांना केलेला शरीरसंबंध बलात्कारच ठरतो.

## अपवाद

१) एखादी वैद्यकीय प्रक्रिया किंवा हस्तक्षेप बलात्कार ठरणार नाही.

२) एखाद्या पुरुषाने आपल्या सज्ञान पत्नीशी केलेला शरीरसंबंध बलात्कार ठरणार नाही.

## ३७६ बलात्कारासाठी शिक्षा

वरील सर्व प्रकारच्या बलात्कारी गुन्हेगारांना सात वर्षापेक्षा कमी नसेल व आजीवन कारावासांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होऊ शकेल शिवाय द्रव्यदंडही होईल.

## पोलीस अधिकारी असणारी जी कोणी व्यक्ती

**१) ज्या पोलीस ठाण्यासाठी अशा पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे. त्या पोलीस ठाण्याच्या सीमेमध्ये परिवास्तूं गृहामध्ये, पोलीस अधिकाऱ्याच्या अभिरक्षेतील वा दुय्यम असलेल्या अभिरक्षेतील महिलेवर बलात्कार झाला तर ती व्यक्ती...**



अ) लोकसेवक असणारी व्यक्ती-अशा व्यक्तीच्या अभिरक्षेतील किंवा दुय्यम असणाऱ्या महिलेवर ती व्यक्ती बलात्कार करीत असेल तर.

ब) केंद्र किंवा राज्य सरकारने एखाद्या क्षेत्रामध्ये तैनात केलेल्या सशस्त्र सेनादलाचा सदस्य असणारी व्यक्ती अशा क्षेत्रामध्ये बलात्कार करील तर....

(**स्पष्टीकरण :-** सशस्त्र सेना दल याचा अर्थ नौदल, भूदल व वायुदल असा आहे. केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्या नियंत्रणारी अर्ध सैनिक दले व कोण साह्यकारी दले यातील सभासद....)

**क)** तुरुंगाच्या व सुधारगृहाच्या अभिरक्षेच्या ठिकाणी व महिलांच्या किंवा बालकांच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणाऱ्या व्यक्तीने जर सहवाशावर बलात्कार केला तर....

**ड)** रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर वा स्टाफवर असणारी व्यक्तीने महिलेवर बलात्कार केला तर....

**ई)** महिलेचा नातेवाईक, पालक किंवा शिक्षक त्या महिलेवर बलात्कार करील ती व्यक्ती...



**फ)** जातीय किंवा धार्मिक दंगलीत महिलेवर बलात्कार करणारी व्यक्ती.

**ग)** महिला गर्भवती आहे हे माहीत असूनही बलात्कार करणारी व्यक्ती.

**ह)** १६ वर्षाखालील अज्ञान मुलीवर बलात्कार करणारी व्यक्ती असेल तर....

**स)** संमती देण्यास असमर्थ असणाऱ्या महिलेवर बलात्कार करणारी व्यक्ती असेल तर.

**ळ)** नियंत्रण व वर्चस्वाखाली असणाऱ्या महिलेवर बलात्कार करणारी व्यक्ती असेल तर....

**ज)** शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या विकलांग असणाऱ्या महिलेवर बलात्कार करणारी व्यक्ती असेल तर....

**ल)** एखादी बलात्कार पीडित महिला बलात्काराच्या वेळी आरोपीकडून गंभीर शारिरीक दुखापत, विकलांग, कुरुप किंवा जीवघेण्या हल्ल्यात पिडीत होईल तर अशा गुन्हेगारास.

**म)** एखाद्या महिलेवर आरोपीकडून सतत बलात्कार होत असेल तर तो आरोपी....

वरील अपासून मपर्यंतच्या विविध प्रकारचे गुन्हेगार दहा वर्षांपेक्षा कमी नाही व आजीवन कारावासाच्या शिक्षेस पात्र होतील आणि द्रव्यदंडही त्यांना होऊ शकतो.

**३७६ अ :-** पीडित व्यक्तीचा मृत्यू घडवून आणल्याबद्दल किंवा पीडित व्यक्तीस कायमस्वरूमी गलितगात्र स्थितीत ठेवण्यास कारणीभूत झाल्याबद्दल शिक्षा- एखादी व्यक्ती जी सज्ञान आहे त्याच्याकडून बलात्कार झाला व त्या दरम्यान पीडित महिला मृत्यू पावली वा विकलांग झाली तर आरोपीस आजीवन सश्रम



कारावास वा मृत्युदंडचीही शिक्षा होऊ शकते.

**३७६ ब:-**फारकतीच्या कालावधीत पतीने आपल्या पत्नीशी लैंगिक संबंध ठेवले तर... फारकतीच्या दरम्यान वेगळ्या राहणाऱ्या पत्नीशी तिच्या संमतीशिवाय बळजबरीने जर लैंगिक संबंध ठेवले तर ती व्यक्ती दोन वर्षांपेक्षा कमी नाही व सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा शिवाय द्रव्यदंडाचीही शिक्षा होऊ शकते.

(यात लैंगिक संभोग चा अर्थ कलम ३७५ च्या खंडात नमूद केलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य)

**३७६ क:-**प्राधिकार असलेल्या व्यक्तीने लैंगिक संभोग करणे.

**अ)** प्राधिकाराच्या वा विश्वासाचित संबंधात असलेली व्यक्ती.

**ब)** लोकसेवक असणारी व्यक्ती.

**क)** तुरुंगाचा, सुधारगृहाचा, महिला व बालकांच्या संस्थेचा अधीक्षक किंवा व्यवस्थापक वरीलप्रमाणे अधिकारावर असणाऱ्या व्यक्तीच्या अभिरक्षेतील किंवा प्रभाराखाली, परिवास्तूत उपस्थितीत असणाऱ्या

महिलेला प्रलोभन दाखवून फूस लावून अशा स्थानाचा वा विश्वासाचित संबंधांचा गैरवापर करून लैंगिक संबंध वा बलात्कार करील तर पाच वर्षांपेक्षा कमी नाही व दहा वर्षापर्यंत कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल व त्याला द्रव्य दंडही होईल.



(या कलमातील संभोग याचा अर्थ कलम ३७५ च्या खंडात नमूद केलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य कलम ३७५ चे स्पष्टीकरण १ देखील लागू असेल. महिला व बालकांच्या संस्थेचा अधीक्षक व इतर कोणतेही पद धारण करणारी व्यक्ती हा नियम रुग्णालयातील पदाधिकाऱ्यांना पण लागू आहे.)

**३७६ ड – टोळीकडून बलात्कार:-** एखाद्या महिलेवर एखाद्या गटाचा घटक, सामाईक उद्देश तडीस नेण्याचे कार्य करणाऱ्या एक किंवा अधिक व्यक्तींनी बलात्कार केला तर, त्या व्यक्ती सज्ञान असतील तर त्यांना आजीवन कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकते. हा द्रव्यदंड पीडित व्यक्तीच्या वैद्यकीय खर्च व पुनर्वसन करण्यासाठी योग्य असा असेल.

**३७६ इ:-महिलेबरोबर लैंगिक संभोग केल्याबद्दल शिक्षा** ज्या व्यक्तीला कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ड अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल तर त्याला आजीवन कारावासाची शिक्षा होईल वा मृत्युदंड ही देण्यात येईल.

**कलम ५०९ ची सुधारणा :-** दंड संहितेच्या कलम ५०९ मधील एक वर्षांपर्यंत वाढविता येईल. इतक्या साध्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्य दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल या ऐवजी तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या साध्या कारावासाच्या शिक्षेस व द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.